RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १२, अंक १४(२)] सोमवार, मे २५, २०२६/ज्येष्ठ ४, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक २७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**


| | |
|---|---|
| **सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४.—** महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग अधिनियम, २०२५ यात सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. .. .. .. | **पृष्ठे** १-३ |


**आदिवासी विकास विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २५ मे २०२६.

**MAHARASHTRA ORDINANCE No. IV OF 2026.**

AN ORDINANCE

TO AMEND THE MAHARASHTRA STATE COMMISSION FOR SCHEDULED TRIBES ACT, 2025.

**सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४.**

**महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग अधिनियम, २०२५ यात सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग अधिनियम, २०२५ यात सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ; २०२५ चा महा. ३६.

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :-

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग (सुधारणा) अध्यादेश, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग अधिनियम, २०२५ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम २ मधील, खंड (ख) मध्ये, "अध्यक्ष" या मजकुरानंतर, ", उपाध्यक्ष" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. २०२५ चा महा. ३६.

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मधील, पोट-कलम (२) मध्ये, खंड (क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईलः-

"(क-१) उपाध्यक्ष, ज्यास सदस्यांमधून नामनिर्देशित करण्यात येईल;".

## निवेदन

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग अधिनियम, २०२५ (२०२५ चा महा. ३६) हा, महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातींच्या हितांचे संरक्षण व रक्षण करण्याच्या; आणि त्यांचे कल्याण व विकास करण्यासाठी सुधारात्मक उपाययोजनांची शिफारस करण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग घटित करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियमित करण्यात आला आहे.

**२.** उक्त अधिनियमाच्या कलम ३ मध्ये, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग घटित करण्याची तरतूद केली आहे, जो अध्यक्ष व सदस्य यांचा मिळून बनलेला असेल. भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३३८क अन्वये अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर सदस्य मिळून राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोग घटित केला आहे. राष्ट्रीय आयोगाच्या रचनेप्रमाणे राज्य आयोगावर देखील उपाध्यक्ष नियुक्त करणे इष्ट आहे, असे वाटते.

**३.** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग अधिनियम, २०२५ यात सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक २२ मे २०२६.

**जिष्णु देव वर्मा,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विजय वाघमारे,**
शासनाचे सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.